PRC/PR/ 14 /2025

# MMRDA Achieves It's First Underground Tunnel Breakthrough for Metro Line 7A

## One Breakthrough, Endless Connections with all Metro Corridors – A Big Step Toward Seamless Airport Access

**Mumbai, 17th April 2025:**

In a landmark moment for Mumbai's metro connectivity, the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) celebrated the successful tunnel breakthrough for Metro Line 7A, which will link the Mumbai Metro Network to Chhatrapati Shivaji Maharaj International Airport (CSMIA). This crucial milestone was completed by the pressing of a button by the august hands of the Hon'ble Chief Minister of Maharashtra, Shri Devendra Fadnavis.The occasion was graced by the presence of Hon'ble Shri Mangal Prabhat Lodha, Minister of Tourism, Skill Development and Entrepreneurship, and MLA Shri Parag Alawani. Dr. Sanjay Mukherjee (IAS), Metropolitan Commissioner, MMRDA, Shri Vikram Kumar, IAS, Additional Commissioner, and Shri Ashwin Mudgal, Additional Commissioner, MMRDA, were also present.

The tunnel—stretching 1.6 km underground—was constructed using a Tunnel Boring Machine (TBM), which was launched on 1st September 2023. The machine had to navigate through several challenges, including passing above the operational underground Metro Line 3 and beneath Sahar Elevated road and utilities. Despite the complexities, the tunnel was successfully completed and broke through today.

Once completed, Metro Line 7A will play a pivotal role in connecting Mumbai's metro corridors to the international airport. It will serve as a crucial link between various parts of the city—from Colaba to Vasai-Virar via Mira-Bhayander—while also creating seamless connectivity to Thane and the upcoming Navi Mumbai International Airport.

Metro Line 7A has two stations:

* Airport Colony Metro Station (Elevated)

* CSMIA Metro Station (Underground)

* The total work on the line is 59% completed

With this breakthrough, MMRDA strengthens its commitment to building an integrated and world-class public transportation system for the Mumbai Metropolitan Region. Out of the 337 km metro network planned, several lines—including Metro Lines 1, 2A, 3, and 7—are already operational.

Shri Devendra Fadnavis, Hon'ble Chief Minister of Maharashtra, said:

**The CSMT to Airport connection has now become a reality and today, we witnessed a marvellous Tunnel Breakthrough on Metro Line 7A. This is truly an engineering marvel, where the elevated and underground metro lines converge. It was a highly complex task, but MMRDA has executed it with excellence. This breakthrough will directly benefit Mumbaikars, easing travel across the city. Our vision is to see 150 km of the Mumbai Metro completed by next year, and today's milestone brings us one step closer to that goal.**

Shri Eknath Shinde, Hon'ble Deputy Chief Minister of Maharashtra and Chairman of MMRDA, said:

**This Tunnel Breakthrough on Metro Line 7A is a remarkable achievement that will revolutionize the way Mumbai moves. It is a proud moment as this engineering marvel connects key areas of the city, including the CST to Airport corridor, in an efficient and seamless manner. MMRDA has worked tirelessly to make this vision a reality. This is about building world-class infrastructure that will benefit every Mumbaikar and every citizen in the MMR region.**

Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA, commented:

**A world-class metro network is taking shape in the Mumbai Metropolitan Region. While this network is being interconnected internally, connecting it to the international airport is a necessity for the city. That is why Metro Line 7A was undertaken, and in just a few months, a tunnel over 1.5 km in length has already been completed. This metro corridor will greatly benefit not only the citizens of the MMR but also national and international tourists traveling across the city.**

## एमएमआरडीएच्या मेट्रो लाईन ७अ साठी पहिला भुयारी बोगदा यशस्वीपणे पूर्ण

## एक बोगदा, सर्व मेट्रो मार्गांना जोडणारा — आंतरराष्ट्रीय विमानतळाशी सहज जोडणीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

मुंबई। १७ एप्रिल २०२५

मुंबईच्या मेट्रो प्रणालीच्या जोडणीसाठी एक ऐतिहासिक टप्पा पार करत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो लाईन ७ए साठीचा १.६ किमीचा भुयारी बोगद्या यशस्वीरित्या पूर्ण केला. बोगद्याचं भुयारीकरण महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते बटण दाबून पूर्ण करण्यात आलं. या महत्वपुर्ण क्षणी पर्यटन, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री आणि श्री. मंगल प्रभात लोढा तसेच माननीय आमदार श्री. पराग अळवणी यांची उपस्थिती लाभली. यासोबतच डॉ. संजय मुखर्जी, भा.प्र.से., महानगर आयुक्त, एमएमआरडीए, श्री. विक्रम कुमार (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त, एमएमआरडीए आणि श्री. अश्विन कुमार मुदगल, अतिरिक्त आयुक्त, एमएमआरडीए हेही उपस्थित होते.

एकूण १.६ कि.मी. लांबीच्या या भुयारी बोगद्याचे बांधकाम 'टनल बोरिंग मशीन' (TBM) च्या साहाय्याने करण्यात आले. ही टीबीएम १ सप्टेंबर २०२३ रोजी कार्यान्वित करण्यात आली होती. या यंत्राने कार्यरत मेट्रो

लाईन ३ च्या वरून आणि महत्त्वाच्या सहार उन्नत रस्त्याखालून तर विविध युटिलिटज अशा अनेक आव्हानांवर मात करत बोगद्याचे खोदकाम केले. या सर्व तांत्रिक आव्हानांवर मात करत आज यशस्वीपणे बोगदा पुर्ण करण्यात आला.

मेट्रो लाईन ७ए पूर्ण झाल्यानंतर, ही लाईन मुंबईतील विविध मेट्रो मार्गांना आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणारा महत्त्वपूर्ण दुवा ठरेल. कुलाबा ते विरारमार्गे मीरा-भाईंदर अशी अखंड जोडणी तर मिळेलच, पण ठाणे आणि आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी देखील सहज कनेक्टिव्हिटी निर्माण होईल.

या मार्गावर दोन स्थानके आहेत:

* एअरपोर्ट कॉलनी मेट्रो स्थानक (उन्नत)

* सीएसएमआयए मेट्रो स्थानक (भुयारी)

* या मार्गाचे एकूण ५९% काम पूर्ण झाले आहे.

या भुयारी बोगदा पुर्ण करत एमएमआरडीएने मुंबई महानगर प्रदेशासाठी एकात्मिक आणि जागतिक दर्जाची सार्वजनिक वाहतूक प्रणाली उभारण्याचा आपला संकल्प अधिक दृढ केला आहे. एमएमआरडीएच्या नियोजनाखालील एकूण ३३७ कि.मी. मेट्रो नेटवर्कपैकी मेट्रो लाईन १, २A, ३ आणि ७ या यापूर्वीच प्रवाशांच्या सेवेत आहेत.

या यशस्वी कामगिरीवर

माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले:

**छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते एअरपोर्ट कनेक्शन आता प्रत्यक्षात साकारत असून, आज मेट्रो लाईन ७ए साठी एक अद्भुत टनल ब्रेक थ्रु साक्षात पाहिला. हा एक अभियांत्रिकी चमत्कार आहे, जिथे उन्नत आणि भुयारी मेट्रो मार्ग एकत्र येतात. हे अत्यंत गुंतागुंतीचे काम होते, परंतु एमएमआरडीएने ते उत्कृष्टतेने पूर्ण केले आहे. हा ब्रेकथ्रू मुंबईकरांना थेट फायदा देईल आणि शहरात प्रवास सुलभ करेल. आमचे उद्दिष्ट पुढील वर्षभरात १५० कि.मी. मेट्रो पूर्ण करणे आहे आणि आजचा टप्पा त्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.**

माननीय उपमुख्यमंत्री व एमएमआरडीए अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे म्हणाले:

**मेट्रो लाईन ७ए साठीचा हा बोगदा पुर्ण होणं हे एक उल्लेखनीय यश आहे, जे मुंबईतील वाहतुकीचा चेहरामोहरा बदलून टाकेल. हा एक अभिमानाचा क्षण आहे, कारण हा अभियांत्रिकी चमत्कार सगळया मेट्रो नेटवर्कला एअरपोर्टशी अत्यंत कार्यक्षम आणि सहज जोडतो. हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी एमएमआरडीएने अविरत परिश्रम घेतले आहेत. हे मुंबईकरांसाठी आणि संपूर्ण एमएमआर परिसरातील नागरिकांसाठी जागतिक दर्जाचे पायाभूत बांधकाम साकारण्याचे एक उदाहरण आहे.**

डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे महानगर आयुक्त, एमएमआरडीए यांनी सांगितले :

जागतिक दर्जाचं मेट्रो नेटवर्क एमएमआरमध्ये घडत आहे. हे मेट्रो नेटवर्क एकमेकांशी संलग्न असतानाच आंतरराष्ट्रीय एअरपोर्टला जोडणं हे या शहराची गरज आहे म्हणुनच मेट्रो मार्गिका

७ए हाती घेण्यात आली. आणि काही महिन्यांतच दिड किमीहुन अधिक लांब हा बोगदा तयारही झाला. ही मेट्रो मार्गिका मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांनाही शहरात प्रवास करताना खूप फायदेशीर ठरेल.




SAFETY



